# मिरा भाईंदर महानगरपालिका

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**

कार्यालय: स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), जि.ठाणे-401101.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www.mbmc.gov.in

मुख्य कार्यालय


जा.क्र. : मिभा/मनपा/आस्था/८६ । 2021-22 दिनांक : 12/04/2021

## - परिपत्रक -

**विषय:- रमजान महिना -2021 मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ - महाराष्ट्र शासन, गृह विभागाकडील परिपत्रक क्र. आरएलपी-0421/प्र.क्र.110/विशा-1 ब दि.12 एप्रिल, 2021**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात कोरोना विषाणूचा मोठ्या प्रमाणात प्रसार होत आहे. त्या दृष्टीकोनातून योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. कोरोना संकटामुळे यावर्षी सर्व धर्मीय सण, उत्सव तसेच सर्व कार्यक्रम अतिशय साधेपणाने साजरे करण्यात येत आहेत. यावर्षी दि. 13 किंवा 14/04/2021( चंद्रदर्शनावर अवलंबून ) ते दि.13 किंवा 14/05/2021 पर्यंत मुस्लिम बांधवांतर्फे पवित्र रमजान महिना साजरा केला जाणार आहे. पवित्र रमजान महिन्यात मुस्लिम समाजामध्ये मोठ्या संख्येने मशिदीमध्ये जाऊन सार्वजनिकरित्या नमाज अदा करण्याची प्रथा आहे. या कालावधीत मुस्लिम बांधव नमाज, तरावीह व इफ्तारसाठी एकत्र येतात. राज्यात सुरु असलेला कोरोनाचा वाढता प्रार्दुभाव पाहता मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या दिनांक 05 एप्रिल, 2021 नुसार पारीत केलेल्या आदेशानुसार व त्यातील **मुद्दा क्र.1, 2 व 13** च्या अधिन राहून या वर्षी पवित्र रमजान महिना साजरा करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून दि.13 किंवा 14/04/2021 रोजी पासून सुरु होणाऱ्या मुस्लीम धर्मियांच्या पवित्र रमजान महिना साजरा करण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत:-

1. कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी पवित्र रमजान महीन्यात मुस्लीम बांधवांनी नियमित नमाज पठण, तरावीह तसेच इफ्तार साठी मशिदीमध्ये अथवा सार्वजनीक ठिकाणी एकत्र न येता सर्वधार्मिक कार्यक्रम आपापल्या घरातच साजरे करावेत. नमाज पठणाकरीता मशिदीत तसेच मोकळ्या जागेत एकत्र येऊ नये.
2. सार्वजनिक ठिकाणी एकावेळी 5 पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र न येता सोशल डिस्टन्सींग व स्वच्छतेच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे (मास्क, सॅनिटायझर इत्यादी) पालन करून पवित्र रमजान महिना अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात यावा.
3. या पवित्र महिन्यात मुस्लीम बांधव 30 दिवस दररोज पहाटेपासून उपवास ठेवतात व संध्याकाळी मगरीब नमाज पुर्वी उपवास सोडतात. या सेहरी व इफ्तारच्या वेळी अनेक फळ व इतर अन्नपदार्थ विक्रेते गर्दी करण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने स्थानिक प्रशासनाने याबाबत योग्य ती उपाययोजना करावी.
4. पवित्र रमजान महिन्याच्या शेवटच्या शुक्रवारी दुवा पठण (अलविदा जुम्मा) करण्याची प्रथा आहे. त्यासाठी मुस्लीम बांधव मोठया प्रमाणात मशिदीमध्ये येऊन दुवा पठण करतात. परंतू यावेळी कोविड 19 चा वाढता प्रादुर्भाव पाहता कोणीही मशिदीमध्ये दुवा पठणाकरीता एकत्र जमू नये. आपापल्या घरातच दुवा पठण करावे.
5. शब-ए-कदर ही पवित्र रात्र रमजान महिन्याच्या 26 व्या दिवशी साजरी करण्याची प्रथा आहे. या निमित्ताने मुस्लीम बांधव तरावीह नमाज संपल्यानंतर आपल्या विभागातील मशिदीमध्ये रात्रभर कुराण पठण व नफील नमाज अदा करतात. परंतू यावर्षी सर्व मुस्लीम बांधवांनी सदर धार्मिक कार्यक्रम आपापल्या घरात राहूनच करावेत.

12.04.2021.

6. पवित्र रमजान महिन्यात बाजारामध्ये सामान खरेदीकरीता गर्दी करू नये किंवा एकत्र जमू नये. तसेच याबाबत स्थानिक प्रशासनाने सामान खरेदीसाठी वेळेचे बंधन घालून दिले असल्यास त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे.
7. धार्मिक स्थळे बंद असल्याने वाझ कार्यक्रमांचे आयोजन शासनाच्या नियमांचे पालन करुन बंद जागेत शक्यतो ऑनलाईन पध्दतीने आयोजित करण्यात यावेत.
8. कोवीड-19 या विषाणूच्या अनुषंगाने राज्यात फौ.दं.प्र.सं.कलम 144 लागू असल्याने तसेच रात्रीची संचारबंदी असल्यामुळे फेरीवाल्यांनी रस्त्यावर स्टॉल लावू नयेत तसेच नागरिकांनी विनाकारण रस्त्यावर फिरू नये.
9. या पवित्र रमजान महीन्यात कोणत्याही प्रकारे मिरवणुका, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक अथवा राजकीय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊ नये.
10. धार्मिक स्थळे बंद असल्याने मुस्लीम समाजातील धर्मगुरु, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून पवित्र रमजान महिना साधेपणाने साजरा करण्याच्या अनुषंगाने जनजागृती करण्यात यावी.
11. पवित्र रमजान महिन्यात सोशल डिस्टन्सिंगच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तसेच मास्क व सॅनिटायझरचा वापर करण्याबाबत काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.
12. कोवीड-19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहीत केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष रमजान सण सुरू होण्याच्या व चालू असतानाच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचेदेखील अनुपालन करावे.

उक्त परिपत्रकाची सर्व संबंधितांनी अंमलबजावणी करावी. सदरहू परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुद्ध यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६०, साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम १८८ नुसार दंडनीय/ कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

13/04/2021.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपलिका**

**प्रत :-**

1) मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
2) मा.पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
3) मा.राज्यमंत्री, नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
4) मा.महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका.
5) मा.मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
6) मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
7) मा.पोलिस आयुक्त, पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईंदर वसई-विरार.
8) मा.जिल्हाधिकारी, जि.ठाणे.
9) मा.उपमहापौर/मा.सभापती,स्थायी समिती/मा.सभागृह नेता/मा.विरोधी पक्षनेता/सर्व गटनेता कार्यालय यांचेकडे माहितीसाठी.
10) स्वीय सहाय्यक, आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचे कार्यालयाकडे माहितीसाठी.
11) उपायुक्त (सर्व) यांचेकडे माहितीसाठी.
12) सर्व सहा.आयुक्त/सर्व विभागप्रमुख यांना माहितीसाठी.
13) मुख्यालय व सर्व प्रभाग समिती कार्यालये, सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महापालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्दीसाठी.